खेडकरसर

VOL. 4 | ISSUE 2 | FEB. 2018
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-55
IMPACT FACTOR: 4.197 (IIJI

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES


A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

SPECIAL ISSUE
On the Occasion of One Day International Conference On

## RECENT ADVANCES IN LANGUAGES, LITERATURE AND SOCIAL SCIENCES

17th February, 2018

(BOOK- 2)



PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

*Guest Editors*

**Prof. Vinod Khedkar**
**Dr. Atmaram Tekale**

ORGANIZED BY
MGEWS
CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES,
KALYAN, DIST. THANE &
NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF
MULTI-DISCIPLINARY STUDIES, PARBHANI

www.newmanpublication.com

VOL. 4 | ISSUE 2 | FEBRUARY 2018 (UGC Approved Journal No. 63716) Impact Factor: 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

(BOOK 2)

Special Issue on:

Recent Advances in Languages, Literature and Social Sciences

*Guest Editors*

Dr. Vinod B. Khedkar

Dr. Atmaram D. Tekale

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

MGEW SOCIETY'S

CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES

KALYAN (MAHARASHTRA)

Contact: +91 9730721393 +91 8329000732 chcskalyan@gmail.com

# अनुक्रमणिका....


| | | |
|---|---|---|
| 1. डॉ. प्रभा अत्रे यांचे सांगितिक साहित्य : उद्देश आणि निर्मिती | | |
| 2. महात्मा जोतीबा फुले आणि स्त्री सबलीकरण | शिवाली पांडे | |
| | प्रा.शऊनखेडकर महानंदा श्रीराम | 05 |
| 3. सॉक्रेटिसचे राजकीय तत्त्वज्ञान आणि लोकशाही | प्रा.डॉ.स्वाती व्ही.पाटील | |
| 4. महिला और राजकारण | डॉ.रेखा रामराव बो | 07 |
| 5. सामाजिक कायदे व समाज कल्याण व परिवर्तनाचे एक साधन | प्रा. कु. सुनिता तु. राठोड | 10 |
| 6. आधुनिकीकरणातील संयुक्त कुटुंबाचे अध्ययन | प्रा. नवनाथ बंकट बढे | 12 |
| 7. विधी संघर्ष ग्रस्त बालक एक अध्ययन | डॉ. संकेत सु. काळे | 15 |
| 8. पर्यावरण मानसशास्त्राची ओळख | डॉ. रावसाहेब ढोके | 20 |
| 9. उपभोक्त्यांच्या वर्तणुकीचे सैद्धांतीक दृष्टिकोन | डॉ.उमाकांत गायकवाड | 25 |
| 10. शास्त्रीय संगीत साधना व आधुनिक तंत्रज्ञान – .... | प्रा. एन. एस. गेडाम | 30 |
| 11. सार्क: उत्क्रांती, परिपूर्ती व आव्हाने | डॉ. विनोद व्ही. ठाकुरदेसाई | 33 |
| 12. गोंड समाजाची लोककला आणि संगीत | प्रा. रणदिवे टी. वाय. | 36 |
| 13. नाट्यसंगीताचे बदलते स्वरुप | प्रा. सचिन सुरेशराव बंडगर | 39 |
| | चारुदत्त गोविंद आफळे | 42 |
| 14. उस्ताद डॉ. गुलाम रसूल (परभणी) .... | डॉ. अनया थत्ते | |
| 15. सतपुडा के कोरकू जनजाति के प्रचलीत नृत्य प्रकार | संजय विष्णू सांगवीकर | 46 |
| 16. संविधानवाद : संकल्पना आणि तत्वे | डॉ.नारायणराव चोरे | 51 |
| | प्रा. डॉ. राजु तनारसे | 55 |
| 17. स्वच्छ भारत मिशन: धोरणात्मक विश्लेषण | डॉ. सत्यपाल हरिभाऊ कांबळे | 57 |
| | प्रा. श्रीकृष्णपरिहार | |
| 18. महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार | प्रा. प्रवीण चव्हाण | 61 |
| 19. भारतीय प्रशासन: नागरी विकासाच्या दिशेने | सौ.अनिता प्रेमराज भोळे | 65 |
| 20. क्रीडा वार्तांची प्रभावक्षमता : एक अभ्यास | डॉ. कदम डी.एम. | 67 |
| 21. ग्रामीण विकासात मनरेगाचे योगदान –एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. उमेश रामचंद्र साडेगावकर | 70 |
| 22. योगाची उत्पत्ती आणि ऐतिहासिक विकास | डॉ. दत्ता एम. तंगलवाड | 74 |
| 23. मुगलकालीन धार्मिक धोरण : एक अभ्यास | प्रा.डॉ.ए.डी.टेकाळे | 77 |
| 24. महिला-सक्षमीकरण आणि कृषीक्षेत्र | डॉ.संजय बाबुराव वाकळे | 79 |
| 25. राजर्षी शाहू महाराजांचे 'स्त्री विषयक' कायद्यांचा सामाजिक अन्वयार्थ | डॉ. अश्रु जाधव | 82 |
| 26. तकनीकी सुविधा और कृषि विस्तार | प्रा. डॉ. सुरेश. वि. धनवडे | 85 |
| 27. भारतीय संगीतातील परंपरा, नव्या संकल्पना व त्यांचा आस्वाद | डॉ. बिरंगणे एस.एस. | 88 |
| 28. भारतीय मतदारांचा बदलणारा दृष्टीकोन .... | डॉ. सुजाता व्यास | 90 |
| 29. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि बुद्ध धम्म | प्रा. सुपेकर व्ही.पी. | 94 |
| 30. लोकसंगीत और मानव जीवन | प्रा. पाटील वंदना सांडूराव | 96 |
| 31. खुल्या कारागृहातील कैद्यांचा पुनर्वसनात्मक अभ्यास | डॉ. वनिता तु. भोपत (केतकर) | 99 |
| 32. भारतीय संगीत पर विज्ञान का योगदान | प्रा. विनोद बी. खेडकर | 100 |
| 33. भारतीय संगीताच्या प्रचार–प्रसाराचे सशक्त माध्यम : वारकरी संगीत | प्रा.डॉ. चंद्रकिरण घाटे | 105 |
| 34. कोरकूओं के वाद्य एंव जानकारी | प्रा. विजय राधाकृष्ण आळशी | 109 |
| 35. ई–प्रशासन व ई–शासन फरक | प्रा.विनोद डिगांबर वानखडे | 112 |
| 36. भारतीय तत्वज्ञानात योगाभ्यासाचे महत्त्व | प्रा. वितेश भारत निकते | 113 |
| 37. आजाद हिंद फौज में डॉ.लक्ष्मी सहगल का योगदान | प्रा. सौ. कुलकर्णी स्वाती ना. | 115 |
| 38. लोकप्रशासन का परिचय | डॉ. विवेकानंद ल. चव्हाण | 117 |
| 39. महिला सशक्तिकरण : के परिप्रेक्ष्य में महिलाओं की स्थिति | प्रा.डॉ. पी.पी. मुंढे | 120 |
| 40. महिला सबलीकरणामध्ये शासनाच्या योजना व कायदयांची भूमिका .... | प्रा.डॉ.पुरुषोत्तम भ. मनगटे | 122 |
| 41. महिलांच्या आरोग्याचा समाजशास्त्रीय अभ्यास | सौ. घुगे जयश्री बापुराव | 125 |
| 42. पडीक जमिनीचा विकास व व्यवस्थापन एक भौगोलिक अभ्यास | पंदिलवाड ए. एम | 127 |
| | प्रा. डॉ घुगे एस. पी | 129 |
| | प्रा. पठाण के. एम | |


DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

31

# खुल्या कारागृहातील कैद्यांचा पुनर्वसनात्मक अभ्यास

प्रा. विनोद बी. खेडकर
सहा. प्राध्यापक
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, नागपूर 440022. मो.नं. : 9421537123

## प्रस्तावना :

समाजाला सदृढ बनविण्यासाठी व समाजामध्ये सुव्यवस्था व शांतता टिकून ठेवण्यासाठी सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता असते. त्यासाठी विभिन्न साधने निर्माण केलेली आहेत. त्या साधनांमध्ये नियमने, कायदा आणि शिक्षा व्यवस्थेचा समावेश होतो. सामाजिक नियंत्रणाच्या औपचारीक साधनांमध्ये कायदा, शिक्षा आणि पुरस्कार हे अत्यंत व्यापक अशी साधने आहेत. समाजातील परिवर्तनानुसार या व्यवस्थेतही बदल होत गेला. तद्वतच शिक्षेची संकल्पना बदलत गेली. शिक्षेचे विविध सिद्धांत मांडले गेले. प्रायश्चित सिद्धांत, प्रतिशोधात्मक सिद्धांत, प्रतिरोधात्मक सिद्धांत, निरोधात्मक सिद्धांत आणि सुधारात्मक सिद्धांत निर्माण होवून या मध्ये देखील सतत परिवर्तन होत राहिले. वर्तमान काळामध्ये सुधारात्मक सिद्धांतावर भर दिला जात आहे. कारण गुन्हेगार हा समाजातील एक घटक मानला जाऊ लागला. माणूस हा परिस्थितीशी सामावून घेतांना चुकतो, असमर्थ ठरतो म्हणून तो गुन्हा करतो. त्याला समाजापासून काहीकाळ दूर ठेवावे. परंतू, त्याला जीवन जगण्याची पुन्हा एकवार संधी दयावी. अशा तऱ्हेचा विचार मान्य होवू लागला. कैदी हा माणूस आहे व त्याला माणसाप्रमाणे वागवावे हा विचार आज मान्य होत आहे. गुन्हेगार हा रोगी आहे आणि त्याच्या रोगाची कारणे केवळ शारीरिक नसुन काहीशी मानसीक विकृती आणि सामाजिक घटना यांच्याशी संबंधीत असतात. त्याचा रोग बरा होई पर्यंत त्याला कारागृहात ठेवण्याची शिक्षा देणे हा आधुनिक दृष्टिकोन निर्माण झाला.[1]

व्यक्तीकडून गुन्हा कोणत्या कारणामुळे घडला? का घडला? त्याच्या गुन्ह्याच्या पाठीमागे समाज हा देखील तितकाच कारणीभूत असतो. म्हणून त्याच्याकडे सुधारणेच्या दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. त्याच सुधारणेचा भाग म्हणून कारागृह निर्माण केले. कारागृह व्यवस्थेमध्ये बदल होत गेला. आज त्याचे स्वरूप बदलत गेले. कैद्यांच्या सुधारणेसाठी वर्तमानात आदर्श कारागृह, केंद्रिय कारागृह, खुले कारागृह, उत्तर संरक्षण सेवा संस्था त्याचप्रमाणे पॅरोल, परिविक्षा निर्माण केले गेले. त्यांना या संस्थामधून विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देवून पुन्हा समाजामध्ये पुनर्वसन केले जात आहे.

गुन्हेगारांचे सुधारणा केंद्र म्हणून सुद्धा कारागृहाकडे पाहिले जाऊ लागले. वेगवेगळी कारागृहामध्ये विविध समित्यांमार्फत परिवर्तन करण्यात आले. त्यापैकीच खुले कारागृह हे एक कैद्यांचे महत्वाचे सुधारणा केंद्र बनले आहे. वर्तमानकाळात खुले कारागृहास कैद्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टिकोनातून महत्व प्राप्त झाले आहे. याच दृष्टिकोनातून कारागृहातील कैद्यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करता येतो. कारण समाजातील प्रत्येक संबंधाचा अभ्यास वैज्ञानिक पद्धतीने समाजशास्त्रात केला जातो. त्याच दृष्टिने समाजशास्त्रातील गुन्हेगारीचे समाजशास्त्रामध्ये गुन्हेगारी क्षेत्रातील गुन्हेगारी वळी, गुन्हेगारांचा गुन्हा करण्यामागील कारणे, त्याचा समाजावर होणारा परिणाम, कारागृह व्यवस्था यांचा अभ्यास समाजशास्त्राच्या संशोधकांनी केलेला आहे. परंतू, कारागृहातील कैद्यांच्या सुधारणासाठी व पुनर्वसनासाठीचे प्रयत्न याकडे सतत दुर्लक्ष झाले आहे म्हणून याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. म्हणून खुल्या कारागृहातील कैद्यांचे जीवन, त्यांना पुनर्वसनाच्या दृष्टिने दिल्या जाणाऱ्या सुविधा, व्यावसायिक प्रशिक्षण, शैक्षणिक सुविधा व कारागृहातील पुनर्वसनाच्या दृष्टिने असलेले वातावरण याचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने प्रस्तूत 'खुल्या कारागृहातील कैद्यांचा पुनर्वसनात्मक अभ्यास' हा शोधनिबंधासाठी विषय निवडला आहे.

## खुले कारागृहाची संकल्पना :

कारागृहातील जीवनामध्ये सुधारणा घडवून येण्यासाठी सर्वात महत्वाची भूमिका खुले कारागृह करत आहे. खुले कारागृह हा गुन्हेगारांना सुधारण्यासाठीचा आजचा सर्वात सफल प्रयोग आहे. वर्तमान स्थितीमध्ये खुल्या कारागृहात फक्त शिक्षा स्थान न मानता यास सुधारणेचे ठिकाण मानले जात आहे. कैद्यांसाठी खुले कारागृह हे सुधारणेचे पर्व मानले आहे. "खुले कारागृह ज्याला कमी सुरक्षेचे कारागृह, खुले शिबीर किंवा बीना गजांचे कारागृह म्हटले जाते. हे असे कारागृह आहे जे चार अर्थाने खुले आहे. 1. कैद्यांसाठी खुले 2. सुरक्षेच्या दृष्टिने खुले 3. संगठनामध्ये खुले व 4. लोकांसाठी खुले".

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

शिक्षेच्या काळात कैदी दिवसा बाजारामध्ये जावू शकतो परंतु रात्री त्यांना परत यावे लागते. खुल्या कारागृहाचा स्पष्ट असा विकल्प आहे की, कारागृहातील अतिगर्दी कमी करणे, खुल्या कारागृहामध्ये कैद्यांमध्ये दृढ विश्वास निर्माण करणे व तो कैदी मुक्त केल्यानंतर पुन्हा फिरून गुन्हेगारीकडे न येणे. वास्तवात खुले कारागृह हे सुरक्षा, संगठन, नातेवाईकांना आपल्या इच्छेनुसार भेटणे व कैद्यांद्वारे दिवसा आपल्या इच्छेनुसार बाजार इत्यादी मध्ये येण्याजाण्याच्या स्वातंत्र्याच्या दृष्टिने खुले आहे[1].

## खुल्या कारागृहाचा इतिहास :

संपूर्ण विश्वामध्ये पहिले खुले कारागृह विट्झविल (Witzwil) इ.स. 1891 मध्ये स्वीत्झरलॅंड मध्ये स्थापन झाले. विट्झविल मध्ये कमित-कमी सुरक्षितता स्थापित केली होती. ही संकल्पना ओटो केल्लेरहाल्स यांची होती[2]. यामध्ये थोडा बदल करून कमितकमी सुरक्षिततेत राहण्याची पद्धत ब्रिटनमध्ये हॉवर्ड गिल यांनी (Howardgill) Norfolk Massachusetts चा प्रयोग करून, Norfolk या संस्थेत कमितकमी सुरक्षिततेचे परिसुत्र ठेवुन कैद्यांना खुली सुट देण्यात आली.

भारतामध्ये खुले कारागृहाची सुरुवात इ.स. 1905 मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सी (Bombay Presidency) ह्या खुल्या संस्थेची स्थापना केली. यामध्ये चांगले वर्तन, मजबूत सुधारणेचे मुलतत्वे, कैद्यांसाठी वर्तनाविषयक नियम सुरु केले[4]. परंतू ही प्रायोगिक पद्धत 1910 मध्ये बंद करण्यात आली. उत्तरप्रदेश राज्यामध्ये डॉ. संपूर्णानंद यांच्या अध्यक्षतेखाली 1 ऑक्टोबर, 1952 मध्ये वाराणसी जिल्ह्यातील चकिया तहसिल अंतर्गत चंद्रप्रभा नदीवर पूल निर्मितीच्या हेतूने भारतामध्ये पहिले खुले शिबीर आयोजित केले[5]. महाराष्ट्रामध्ये खुल्या कारागृहाची स्थापना 1955 मध्ये पुणे येथील येरवडा येथे झाली. वर्तमान स्थितीमध्ये महाराष्ट्रात चार खुले कारागृह आहेत. येरवडा खुले कारागृह पुणे, जिल्हा खुले कारागृह, पैठण (औरंगाबाद), खुले कारागृह मोर्शी, व खुले कारागृह गडचिरोली इत्यादी.

## पद्धतीशास्त्र :

कोणत्याही विषयाच्या संशोधनासाठी निश्चित कार्ययोजना तयार करावी लागते. तसेच ज्या विषयाचे अध्ययन करावयाचे आहे त्या विषयाची मांडणी ही उद्दिष्टपूर्ण असावी लागते.

## समग्र संशोधनाचे अध्ययन क्षेत्र :

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथील जिल्हा खुले कारागृह निवडलेले आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :

खुल्या कारागृहातील घेतल्या जाणाऱ्या उपक्रमाचा कैद्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टिने अभ्यास करणे.

## संशोधनाची गृहितकृत्ये :

खुल्या कारागृहामध्ये घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमामुळे कैद्यांच्या पुनर्वसनास मदत होत आहे.

## नमुना निवड पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पैठण येथील खुल्या कारागृहातील कैद्यांची निवड केलेली आहे. संशोधकाने गैर-संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक किंवा उद्देशपूर्ण नमुन्याची निवड केली आहे. यासाठी ऐच्छिक नमुना निवड पद्धतीने 100 कैद्यांचा नमुना घेतला आहे.

## तथ्य संकलनाची पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खुले कारागृहामधील कैद्यांच्या पुनर्वसनासाठी केले जाणारे प्रयत्नाच्या संदर्भात प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची या तथ्य संकलन तंत्राचा उपयोग केला आहे. तसेच दुय्यम पद्धतीमधील प्रकाशित साहित्य, लेख, मासिके, वर्तमानपत्रे आणि ईंटरनेट वेबसाईट इत्यादींचा उपयोग केला आहे.

## कैद्यांच्या पुनर्वसनासाठीचे प्रयत्न :

तक्ता क्र. 1

कैद्यांना व्यवसाय निवडण्याचे असणारे स्वातंत्र्य

| अ.क्र. | उत्तरदात्यांना व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | इच्छेनुसार व्यवसाय निवडण्याची संधी दिली जाते | 89 | 89% |
| 2. | व्यवसाय निवडण्याची संधी दिली जात नाही | 11 | 11% |
| | एकूण | 100 | 100% |

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

खुल्या कारागृहामध्ये कैद्यांना व्यवसाय निवडण्याचे असण्याऱ्या स्वातंत्र्याचा अभ्यास केला

असता असे दिसून आले की, 89 टक्के उत्तरदात्यांचे मते इच्छेनुसार व्यवसाय निवडण्याची संधी दिली जाते तर 11 टक्के उत्तरदात्यांच्या मते व्यवसाय निवडण्याची संधी दिली जात नाही.

यावरून खुल्या कारागृहामध्ये उत्तरदात्यांना इच्छेनुसार व्यवसाय निवडण्याची संधी दिली जाते. कैद्यांची आवड कशामध्ये आहे, तो कोणते काम चांगल्याप्रकारे करू शकतो ते काम त्याला देऊन त्यामध्ये त्याला परिपूर्ण करणे, जेणे करून तो सुटल्यानंतर तो व्यवसाय करून कुटूंबाचा उदरनिर्वाहाची जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडेल म्हणून त्याला व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य दिले जाते. तसेच त्यांना व्यवसाय निवडीची संधी असल्याने कोणताही, एक व्यवसाय निवडून त्याचे योग्य प्रशिक्षण घेवून चांगला व्यवसाय करणे क्रमप्राप्त ठरेल आणि त्यांचे पुनर्वसनास मदत होईल.

तक्ता क्र. 2

कैद्यांनी खुल्या कारागृहामध्ये घेतलेले व्यावसायीक प्रशिक्षण

| अ.क्र. | उत्तरदात्याने घेत लेले व्यवसायीक प्रशिक्षण | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | शेतीकाम | 40 | 40% |
| 2. | बागकाम | 12 | 12% |
| 3. | शिवणकाम | 06 | 06% |
| 4. | बांधकाम | 05 | 05% |
| 5. | धोबीकाम | 01 | 01% |
| 6. | यंत्रमाग | 07 | 07% |
| 7. | सुतारकाम | 04 | 04% |
| 8. | वल्डींग, इलेक्ट्रॉनिक्स रिपेरिंग, फॅब्रिकेशन, लोहारकाम, रोपवन | 07 | 07% |
| 9. | शेतीकाम व बागकाम | 13 | 13% |
| 10. | शेतीकाम व बांधकाम | 05 | 05% |
| | एकूण | 100 | 100% |

खुल्या कारागृहामध्ये व्यावसायीक प्रशिक्षणाचा अभ्यास केला असता असे म्हणता येते की, बहुतेक कैदी हे ग्रामीण भागातील असून ग्रामीण भागातील व्यक्तींचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेती हे कुटूंब उदरनिर्वाहाचे उत्तम व महत्वाचे साधन आहे. म्हणून शेतीकाम व शेती संबंधी येणारे बागकामाचे प्रशिक्षण घेतलेल्या कैद्यांचे प्रमाण 70 टक्के सर्वाधिक आहे. या सर्व व्यावसायीक प्रशिक्षणामुळे कैद्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी, समाजामध्ये प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी मदत होते.

थोडक्यात बहुतांश उत्तरदात्यांनी शेतीकाम व बागकामाचे व्यावसायीक प्रशिक्षण घेतलेले आहे व त्या खालोखाल बांधकाम यंत्रमाग, शिवणकाम व धोबीकामाचे व्यावसायीक प्रशिक्षण घेतलेले दिसून येतात. ही सर्व व्यावसायीक प्रशिक्षण कैद्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने महत्वाचे आहेत.

तक्ता क्र. 3

कैद्यांचे कारागृहातील व्यवसायीक प्रशिक्षण विषयी मत

| अ.क्र. | उत्तरदात्यांचे प्रशिक्षणा विषयी मत | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | आजच्या काळाशी सुसंगत | 92 | 92% |
| 2. | काही प्रमाणात सुसंगत | 05 | 05% |
| 3. | सुसंगत नाही | 03 | 03% |
| | एकूण | 100 | 100% |

उत्तरदात्यांचे खुल्या कारागृहातील व्यावसायीक प्रशिक्षणाविषयी मत जाणून घेतले असता असे दिसून आले की, 92 टक्के कैद्यांच्या मते खुल्या कारागृहामधील व्यावसायीक प्रशिक्षण आजच्या काळशी सुसंगत आहे.

यावरून असे म्हणता येते की, दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणामधून कौटूंबिक उदरनिर्वाह भागविण्यास, स्वावलंबी बनविण्यास व पुनर्वसनाच्या दृष्टिने मदत होईल. असा विश्वास त्यांना वाटतो.

तक्ता क्र. 4

खुल्या कारागृहामध्ये घेतल्या जाणाऱ्या शैक्षणिक स्पर्धेमध्ये सहभागी झालेले कैदी

| अ.क्र. | स्पर्धे मध्ये सहभागी झालेले कैदी | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | वाचन स्पर्धा | 01 | 2.38% |
| 2. | लेखन स्पर्धा | 12 | 28.57% |
| 3. | निबंध स्पर्धा | 14 | 33.34% |

DR. M.K. UMATHE COLLEGE NAGPUR

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | एकांकिका | 01 | 2.38% |
| 5. | वाचन व लेखन स्पर्धा | 02 | 4.76% |
| 6. | वाचन व निबंध स्पर्धा | 02 | 4.76% |
| 7. | लेखन व निबंध स्पर्धा | 10 | 23.81% |
| | एकूण | 100 | 100% |

खुल्या कारागृहामध्ये घेतल्या जाणाऱ्या शैक्षणिक स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या उत्तरदात्यांचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, 84 टक्के (84) उत्तरदाते शिक्षीत असून त्यापैकी 50 टक्के (42) उत्तरदात्यांनी शैक्षणिक स्पर्धेमध्ये भाग घेतला आहे.

थोडक्यात खुल्या कारागृहामध्ये शैक्षणिक स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्यापैकी लेखन स्पर्धे मध्ये भाग घेणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण 57.14 टक्के आहे. त्याच बरोबर निबंध स्पर्धेत भाग घेणाऱ्याचे प्रमाण 61.90 टक्के आहे. लिखाण करणे, निबंध स्पर्धेत भाग घेणे यातून या कैद्यांची मानसिकता समजण्यास मदत होते. त्या अनुषंगाने त्यांचे पुनर्वसन अधिक चांगल्या प्रकारे करता येणे शक्य होते.

तक्ता क्र. 5

खुल्या कारागृहातील कैद्यांना असलेला छंद

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा छंद | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | वाचन | 33 | 33% |
| 2. | लेखन | – | – |
| 3. | खेळणे | 15 | 15% |
| 4. | अभिनय | 02 | 02% |
| 5 | चित्र काढणे | – | – |
| 6. | टी.व्ही. पाहणे, गाणे ऐकणे, क्रिकेट खेळणे | 28 | 28% |
| 7. | वाचन व लेखन | 02 | 02% |
| 8. | वाचन व खेळणे | 07 | 07% |
| 9. | वाचन, लेखन व अभिनय | 09 | 09% |
| 10. | लेखन व अभिनय व गाणे ऐकणे | 02 | 02% |
| 11. | वाचन, लेखन अभिनय व चित्र काढणे | 02 | 02% |
| | एकूण | 100 | 100% |

यावरून असे म्हणता येईल की, 53 टक्के उत्तरदात्यांना वाचनाचा छंद आहे. कैद्यांनी या छंदामधुन रामायण, महाभारत, दासबोध, कुराण, तुकारामाची गाथा, महात्मा गांधी यांच्या विचारांची पुस्तके, विविध कथा–कादंबऱ्या इत्यादी पुस्तके वाचल्याची निरीक्षणांती दिसून येते. एकूण या विविध छंदामधून या गुन्हेगारांचे व्यक्तीमत्व लक्षात येवू शकते व त्या अनुषंगाने पुनर्वसनाची दिशा असणे आवश्यक ठरते.

तक्ता क्र. 6

उत्तरदात्यांचे खुल्या कारागृहा विषयी असलेले मत

| अ.क्र. | खुल्या कारागृहा विषयीचे मत | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | खुले कारागृह चांगले जीवन जगण्यास शिकविते | 19 | 19% |
| 2. | पुनर्वसनाच्या दृष्टिने चांगले आहे | 50 | 50% |
| 3. | येथिल वातावरण चांगले आहे | 07 | 07% |
| 4. | सुविधांच्या दृष्टिने चांगले | 09 | 09% |
| 5. | येथे कैद्यांचे मनोबल वाढविण्यास मदत होते. | 7 | 07% |
| 6. | विद्यापीठ प्रमाणे कारागृह आहे | 01 | 01% |

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

 ISSN: 2454-5503 Impact Factor: 4.197 (IIJIF)

| | | | |
|---|---|---|---|
| 7. | येथिल सांघीक जीवनामुळे दुःख विसरण्यास मदत होते | 05 | 05% |
| 8. | मोठ्या प्रमाणात व्यावसायीक प्रशिक्षण मिळते | 01 | 01% |
| 9. | वसतीगृह प्रमाणे आहे | 01 | 01% |
| | एकूण | 100 | 100% |

कैद्यांचे खुल्या कारागृहा विषयी मत जाणून घेतले असता असे दिसून आले की, 50 टक्के उत्तरदात्यांच्या मते खुले कारागृह पुनर्वसनाच्या दृष्टिने चांगले आहे. कारण खुल्या कारागृहामध्ये पुनर्वसनाच्या दृष्टिकोनातून कैद्यांना व्यावसायीक प्रशिक्षण दिले जाते. त्याचप्रमाणे कैद्यांना शिक्षणास प्रोत्साहन दिल्या जाणाऱ्या सुविधा व विविध शिबीरांचे आयोजन केले जाते. या शिबीरात व्याख्याने, शिक्षण, विविध सुविधा आणि व्यावसायीक प्रशिक्षणामुळे कैद्यांमध्ये सकारात्मक बदल पुनर्वसनाचा दृष्टिने महत्वाचा ठरतो आहे.

**निष्कर्ष :**

1. खुल्या कारागृहामध्ये उत्तरदात्यांना इच्छेनुसार व्यवसाय निवडण्याची संधी दिली जाते. त्यांना व्यवसाय निवडीची संधी असल्याने कोणताही एक व्यवसाय निवडुन त्याचे योग्य प्रशिक्षण घेवून चांगला व्यवसाय करणे क्रमप्राप्त ठरेल आणि त्याच्या पुनर्वसनास मदत होते.
2. बहुतांश उत्तरदात्यांनी शेतीकाम व बागकामाचे व्यावसायीक प्रशिक्षण घेतलेले आहे व त्या खालोखाल बांधकाम, यंत्रमाग, शिवणकाम व धोबीकामाचे व्यवसायाचे प्रशिक्षण घेतलेले आहे. ही सर्व व्यावसायीक प्रशिक्षण कैद्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टिने महत्वाचे आहेत.
3. दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणामधून कौटुंबिक उदरनिर्वाह भागविण्यास स्वावलंबी बनण्यास व पुनर्वसनाच्या दृष्टिने मदत होईल. असा विश्वास कैद्यांना वाटतो.
4. खुल्या कारागृहात विविध स्पर्धांमध्ये भाग घेतल्याने कैद्यांची मानसिकता समजण्यास मदत होते. त्या अनुषंगाने त्यांचे पुनर्वसन अधिक चांगल्याप्रकारे करता येणे शक्य होते.
5. विविध छंदांमधून गुन्हेगार कैद्यांचे व्यक्तिमत्व लक्षात येवू शकते व त्या अनुषंगाने पुनर्वसनाची दिशा असणे आवश्यक आहे.
6. शिबीरे, व्याख्याने, विविध सुविधा, व्यावसायीक प्रशिक्षण, शिक्षणास प्रोत्साहन त्याचप्रमाणे सांघीक जिवनामुळे कैद्यांमध्ये आलेला बदल व खुल्या कारागृहातील उपक्रमामुळे खुले कारागृह कैद्यांच्या दृष्टिने पुनर्वसनासाठी महत्वाचे ठरते आहे.

**संदर्भ सुची :**

१. काळदाते सुधा, गोटे – मढाणे सुमांगी (प्रथम 2003) गुन्हेगारीचे समाजशास्त्र (अपराधशास्त्र) श्रीविद्या प्रकाशन, पुणे. पृ.क्र. 16

२. Paranjape N. V., (Ad. 12 2005) Criminology And Penology, Central law publications, Allahabad 2 P No. 391

३. Howard Jones, Paul Cornes, Richard Stockford (1977). 'Open Prison'. Routledge and Kegan Paul Publication, London, Henley and Boston Page No 94

४. Datir R N (1978). Prison as a social system, popular prakashan, Bombay P. 376

५. Gour K.D., (1992). Criminal Law, Criminology and criminal administration. Deep And Deep Publication, New Delhi, P. 771

**संदर्भ ग्रंथ सुची :**

१. आहुजा राम, (2008). सामाजिक अनुसंधान, रावत पब्लिकेशन्स, जयपूर, नई दिल्ली.

२. आहुजा राम, आहुजा मुकेश. (1998). विवेचनात्मक अपराधशास्त्र, रावत पब्लिकेशन्स, जयपूर एवं नई दिल्ली.

३. Ahmad Siddique, (1997), Criminology Problems and Perspectives, Estern Book Company, Lucknow.

४. Chandra Devendra, ( . ). Open Air Prison A Sociological Study, Vohra publishers and distributors, Allahabad.

५. Ghosh S., (1992). Open Prisons And The Inmates, (A Socio-psychological study). Mittal publication. New Delhi.

θθθ

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022
DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR